# सेवक वार्ता

e-mail : http://www.mahasevak.com

अंक ४, वर्ष - २ फेब्रुवारी २०२१

**सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, पुणे**

**नोंदणीकृत कार्यालय -ब-८, सारसनगर सोसायटी, शुक्रवार पेठ, पुणे ४११००२**

**संपादकिय** -

सेवकची दरमहिन्याची पहिल्या मंगळवारी नियमितपणे होणारी मासिक सभा ३ मार्च २०२० मध्ये पार पडली व त्यानंतर कोविड १९ महामारीमुळे २५ मार्चपासून टाळेबंदी सुरु झाली व सेवकच्या मासिक सभा बंद पडल्या. इतरही कामे ठप्प झाली. कॅम्पाचे मुल्यांकनाचे क्षेत्रिय काम पुर्ण झालेले असल्याने अहवाल तयार करणे इ. कार्यालयीन काम पुर्ण झाले. अर्थात त्यालाही टाळेबंदीमुळे काहिसा विलंब झाला मात्र हे काम अखेरिस पार पडले.

या दरम्यान महाराष्ट्र राज्य बांबु विकास मंडळाचे मुल्यांकनाचे काम सेवक ला मिळाले व क्षेत्रिय काम पुर्णही झाले. आता पुन्हा एकदा कोविड १९ डोके वर काढत आहे व काही जिल्हयांमध्ये टाळेबंदी काही प्रमाणात सुरुही झाले आहे.

सेवकच्या प्रत्यक्ष मासिक बैठका बंद पडल्या असल्या तरी तंत्रज्ञानाचा वापर करुन १ सप्टेंबर पासून आभासी बैठका (Online/virtual meetings) झुम ॲप द्वारे सुरु झाल्या ही जमेची बाजू म्हणावी लागेल. त्यानंतर दुसरी आभासी बैठक ६ ऑक्टोबर, तिसरी बैठक ३ नोव्हेंबर, चवथी बैठक १ डिसेंबर व पाचवी बैठक ५ जानेवारी २०२१ रोजी पार पडली. या तंत्रज्ञानाचा एक फायदा म्हणजे तुम्ही कुठूनही बैठकीत सहभागी होऊ शकता. पाचव्या बैठकीच्या वेळी (५ जानेवारी) मी बाहेरगावी रत्नागिरी येथे होतो व तेथूनही मी या बैठकीत सहभागी होऊ शकलो.

कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर सर्वांनी आपल्या आरोग्याची अधिक काळजी ही विनंती करतो.

**सेवकची व्यवस्थापकीय समितीची जानेवारी मधील मासिक बैठक संपन्न**

सेवकची व्यवस्थापकीय समितीची जानेवारी मधील मासिक बैठक आभासी पध्दतीने (झूम ॲपद्वारे) दि. ५ जानेवारी रोजी ११ वा. संपन्न झाली. या बैठकीस खालीलप्रमाणे सदस्य हजर होते. १. श्री. एस. के. गवळी २.श्री. संजय जगताप ३. श्री. ए.आर. ठाकरे ४.श्री. व्हि. टी. पत्की ५. श्री. व्हि. ए जोशी ६. डॉ. एस. एच. पाटील ७.श्री.शिरीष अस्थाना ८. श्री. एम.एम. कुलकर्णी ९.श्री.आर. एस. कदम १०. श्री. उमेश धोपेश्वरकर.

सुरुवातीला श्री. गवळी यांनी उपस्थित सर्व सदस्यांचे स्वागत केले व सर्वांना नविन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर खालील महत्वाचे विषयावर चर्चा झाली.

१. सर्व समिती सदस्यांनी दुःखद निधन झालेले सदस्य श्री.माधव गोगटे, विजय भोसले, एन. आर. सावंत व एस. व्हि. वैद्य यांनी सेवकला दिलेल्या योगदानाचे स्मरण करुन त्यांना श्रध्दाजंली अर्पण केली.

२. नागपूर वनवृत्ताची सेवक समिती स्थापन करण्यात आली असून व्यवस्थापन समितीने या समिती सदस्यांचे स्वागत केले.

३. श्री. पत्की यांनी बांबू मुल्यांकन कामाची कार्यपध्दती निश्चित केली असून सर्व संबंधितांनी सूचना देण्यात आल्याचे सांगितले.

४. स्व. श्री. गोगटे यांचे आठवणींचे पुस्तकासाठी ३० आर्टीकल्स आले असून आणखी काही आर्टीकल्स अपेक्षित असल्याची माहिती डॉ. पाटील यांनी दिली.

श्री. संजय जगताप यांनी स्व. श्री. भोसले यांचे सुमारे १५० पृष्ठांचे पुस्तक तयार असून त्याची छपाई लवकरच पूर्ण होईल अशी माहिती दिली.

श्री. गवळी यांनी बारिपाडा रानभाज्या पुस्तकातील २००० प्रतींपैकी ९०० प्रतींची विक्री झाली असून १०० प्रती सेवक-पुणे कार्यालयास पाठविल्याची तसेच ५०० प्रती ग्रामविकास समिती बारिपाडा यांना मोफत दिल्याची व ५०० प्रति शिल्लक असल्याची माहिती दिली.

सेवकमध्ये नव्याने आजीव सदस्य म्हणून रुजू झालेले श्री. राजेंद्र कदम व मदन कुलकर्णी या दोन सदस्यांचे स्वागत कार्यकारीणी समितीने केले. या दोन जेष्ठ सदस्यांचे अनुभवाचा सेवकचे वाढीस निश्चितच फायदा होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

**बांबू मुल्यांकनाची क्षेत्रिय कामे पुर्ण** –

महाराष्ट्र राज्यातील बांबू विकास मंडळामार्फत लागवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांचे शेतातील रोपांचे सेवकमार्फत मुल्यांकनाचे काम पुर्ण झाले आहे. हे काम गोंदिया, भंडारा, मुंबई हे ४ जिल्हे वगळता सर्व ३२ जिल्हयांमध्ये करण्यात आले आहे. या ३२ जिल्हयातील ६७ तालुक्यांमध्ये सेवकचे ३८ सदस्यांनी हे काम पुर्ण केले आहे. एकूण ३५५४ साईट्सपैकी ७३५ साईट्स वर हे काम करण्यात आले आहे. या संपूर्ण कामाचे नियोजन जेष्ठ सदस्य श्री. वि. त्र्यं. पत्की यांनी कुशलतापुर्वक पुर्ण केल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन ! क्षेत्रीय कामात सहभागी सर्व ३८ सदस्यांनी त्यांचे काम वेळेत पूर्ण केल्याबद्दल त्यांचेही हार्दिक आभार !

**सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ महाराष्ट्र अंतर्गत नागपूर वनवृत्ताकरीता बैठकीचा कार्यवृत्तांत**

१. सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ महाराष्ट्र अंतर्गत नागपूर वनवृत्ताकरीता कार्यकारिणी निवडण्याबाबत सदस्यांची बैठक आज दिनांक २५-१२-२०२० रोजी नागपूर येथे घेण्यात आली.

२. या बैठकीस खालील सेवानिवृत्त वनअधिकारी उपस्थित होते. सर्वश्री (१) ए. एस. खुणे विवअ (२) जी एस खांडेकर विवअ (३) एन.डब्ल्यू. कावळे विवअ (४) ए आर खान सवसं (५) के ओ सेमस्कर विवअ (६) बी व्ही सेलूकर सवसं (७) टी. आर. नंदेश्वर वपअ

३. श्री जी. के. वशिष्ठ विवअ व श्री के डी पेशने विवअ हे त्यांच्या वैयक्तिक कारणास्तव सभेस हजर राहू शकले नाहीत. श्री वशिष्ठ यांनी श्री खुणे यांना वाट्सएप संदेश दिला होता की या बैठकीत होणारे सर्व निर्णय त्यांना मान्य राहतील.

४. अमरावती वनवृत्ताचे सहअध्यक्ष श्री एस एम जगताप, विभागीय वन अधिकारी हे या सभेस आवर्जून उपस्थित होते. त्यांनी सभेस अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले. महाराष्ट्र स्तरावरील संघातर्फे घेण्यात येणारी कामे, त्यांचे नियोजन, संघाचे उद्दिष्ट इत्यादीबाबत याबाबतची माहिती त्यांनी दिली. वरील कार्यकारणीकडून सुद्धा कोणत्या प्रकारची कामे घेता येतील व यापूर्वी अमरावती वृत्ताकडून कोणकोणती कामे घेण्यात आली व त्या कामाची यशस्वीता याबाबतही त्यांनी विस्तृतपणे माहिती दिली.

५. नागपूर वनवृत्ताकरिता खालीलप्रमाणे कार्यकारिणी निवडण्यात आली. श्री जी.के. वशिष्ठ सहअध्यक्ष, श्री. ए. एस. खुणे उपाध्यक्ष, श्री जी.एस.खांडेकर सचिव, श्री. एन. डब्ल्यू. कावळे सहसचिव व श्री ए.आर. खान कोषाध्यक्ष

६. वरील प्रमाणे कार्यकारिणी निवडल्याबाबतची माहिती, त्यास मान्यता मिळावी म्हणून, महाराष्ट्र संघास देण्यात आली. नागपूर वृत्तातील कामाकरिता बँकेत नवीन खाते उघडण्याचे निश्चित करण्यात आले. महाराष्ट्र स्तरावरील संघाकडून याबाबत परवानगी प्राप्त झाल्यानंतरच बँकेत खाते उघडण्यात येईल असेही निश्चित करण्यात आले तसेच सदस्य संख्या वाढविण्याच्या दृष्टीने जास्तीत प्रयत्न करण्याचे निश्चित करण्यात आले.

७. या बैठकीत असाही ठराव मंजूर करण्यात आला की नागपूर वनवृत्त शाखेच्या खालील तीन पदाधिकाऱ्यांपैकी कोणत्याही दोन पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने बँकेचे खाते **operate** करता येईल. श्री जी.के. वशिष्ठ सहअध्यक्ष, श्री जी.एस.खांडेकर सचिव व श्री ए.आर. खान कोषाध्यक्ष

८. श्री जगताप व इतर सर्व उपस्थित यांचे आभार म्हणून मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.




कार्यकारिणी निवडीच्या सभेत उपस्थित डावीकडून श्री.जगताप विवअ अमरावती, श्री.खांडेकर विवअ, श्री.खान सवसं, श्री.खुणे विवअ, श्री.नंदेश्वर वपअ, श्री.सेलुकर सवसं, श्री.सेमस्कर विवअ.

**चंद्रपूर वृत्त कार्यकारीणीची निवड**

चंद्रपूर वृत्ताची सेवकची कार्यकारीणी देखील स्थापन झाली असून कार्यकारीणी सदस्यांचे हार्दिक अभिनंदन !

-----------------------------------------------------

प्रकाशक : सेवक, पुणे
संपादन : डॉ. शे. हिं. पाटील, भावसे (सेवानिवृत्त) प्रधान मुख्य वनसंरक्षक